# कॉक्सिटमध्ये ‘ इंटनॅशनल इंटरनेट डे ‘ साजरा

लातूर- कॉक्सिटमध्ये ‘ इंटनॅशनल इंटरनेट डे ‘ साजरा करण्यात आला. इंटरनेटचा वापर कसा सुरक्षितपणे करावा याबाबतचा मार्गदर्शनपर कार्यक्रम घेण्यात आला.

२९ ऑक्टोबर १९६९ या दिवशी पहिला इलेक्ट्रॉनिक मेसेज पाठविण्यात आला होता. सध्या इंटरनेट हे आयुष्याचा अविभाज्य अंग बनल्यामुळे जगभरात २९ ऑक्टोबर हा ‘इंटनॅशनल इंटरनेट डे ‘म्हणून साजरा करण्यात येतो. कॉक्सिटमध्ये इनोव्होशन सेंटरतर्फे इंटरनेटचा वापर सुरक्षितपणे करण्यासाठी मागदर्शनपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी प्रा.जे.सी.शेख यांनी सोशल कम्युनिटीजवर आपले अकांउट हॅक होवू नये यासाठी करावयाच्या उपाययोजनांची माहिती उपस्थितांना दिली. कार्यक्रमाला उपप्राचार्य डॉ.बी.एल.गायकवाड, उपप्राचार्य एन.एस.झुल्पे, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन प्रा.किशोर जेवे यांनी केले.